जनमानसाचा निडर आवाज...

पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २०२ | रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER



## स्वारगेट, शिवाजीनगर अन् पिंपरी मेट्रो स्थानकांवर मोठा बदल

**पुणे, ता. १४ :** मेट्रोने प्रवास करणाऱ्या पुणे आणि पिंपरी-चिंचवडकरांसाठी महत्त्वाची सुविधा उपलब्ध होत आहे. प्रवास अधिक सुलभ आणि सुरक्षित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) यांनी शहरातील तीन प्रमुख स्थानकांवर अतिरिक्त प्रवेशद्वारे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. १४ फेब्रुवारीपासून पिंपरी-चिंचवड मनपा मेट्रो स्थानक, शिवाजीनगर मेट्रो स्थानक आणि स्वारगेट मेट्रो स्थानक येथे प्रवाशांना नव्या मार्गाने ये-जा करता येणार आहे. स्वारगेट मेट्रो स्थानकावर प्रवेशद्वार क्रमांक ५ सुरू होत असून एसटी बसने येणाऱ्या प्रवाशांसाठी ही मोठी सोय ठरणार आहे. आता एसटी स्टँडच्या बाजूने भुयारी मार्गाने थेट मेट्रोमध्ये प्रवेश मिळणार असल्याने जेधे चौकातील वाहतूक कोंडी आणि गजबजलेल्या रस्त्यावरून जाण्याचा धोका टळणार आहे.

शिवाजीनगर स्थानकावर प्रवेशद्वार क्रमांक ३ आकाशवाणी केंद्राजवळील शिमला ऑफिस चौक परिसरात सुरू होत आहे. गणेशखिंड रस्ता आणि कृषी महाविद्यालयाच्या दिशेने येणाऱ्या प्रवाशांना मुख्य रस्ता ओलांडण्याची गरज उरणार नाही. भुयारी मार्गामुळे सुरक्षितता वाढेल आणि वेळेचीही बचत होईल.

पिंपरी-चिंचवड मनपा स्थानकावर प्रवेशद्वार क्रमांक ३ पुणे-मुंबई महामार्गाच्या मुंबईकडे जाणाऱ्या बाजूला सुरू करण्यात येत आहे. महामार्ग ओलांडण्याची कसरत टळणार असल्याने नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित होणार आहे.

दरम्यान, मेट्रो स्थानकांवरील या नव्या प्रवेशद्वारांमुळे प्रवाशांची गर्दी व्यवस्थापन, सुरक्षितता आणि वेळेची बचत या तिन्ही बाबींमध्ये सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. वाढत्या प्रवासी संख्येच्या पार्श्वभूमीवर महामेट्रोने घेतलेला हा निर्णय शहराच्या सार्वजनिक वाहतुकीसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# लोणी काळभोर वाहतूक पोलिसांचा सर्वसामान्यांसाठी दुहेरी न्याय

## कष्टकऱ्यांवर कारवाई, अवजड वाहने व अवैध प्रवासी वाहतूक मोकाट!

विशाल कदम

लोणी काळभोर, ता. १४ : पुणेसोलापूर महामार्ग परिसरातून अवजड वाहने व अवैध प्रवासी वाहतूक दिवसाढवळ्या सुसाट सुरू असताना, त्यांच्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून सामान्य दुचाकीस्वारांनाच लक्ष्य केले जात असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून होत आहे. मागील चार दिवसांपासून लोणी काळभोर परिसरात पुणे शहर वाहतूक पोलीस यांच्याकडून सुरू असलेल्या दंड मोहिमेने कष्टकरी, शेतकरी, नोकरदार, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत.

लोणी स्टेशन चौक व थेऊर फाटा येथे बुधवार (ता. ११) ते शनिवार (ता. १४) या कालावधीत वाहतूक पोलिसांचे घोळके थेट रस्त्यात उभे राहत दुचाकी गाड्या अडवत असल्याचे चित्र दिसून आले. परिणामी एकीकडे महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे, तर दुसरीकडे



सर्वसामान्य नागरिकांना हजारो रुपयांच्या दंडाला सामोरे जावे लागत आहे. सकाळी कामावर निघालेले कर्मचारी, शेतमाल घेऊन जाणारे शेतकरी आणि कॉलेजला जाणारे विद्यार्थी तासन्तास अडकून पडत असल्याचे चित्र रोजचे झाले आहे.

वाहतूक शिस्त लावण्याऐवजी पोलिस स्वतः रस्त्यावर उभे राहून वाहने अडवत असल्यामुळे कोंडीत भरच पडत आहे. अनेक वेळा रुग्णवाहिका, शालेय वाहने तसेच अत्यावश्यक सेवा वाहनांनाही पुढे जाण्यास अडचणी निर्माण होत आहेत. वाहतूक शिस्तीच्या नावाखाली दंडाची लूट सुरू आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, याच मार्गावरून नियमबाह्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बस, ओव्हरलोड ट्रक आणि अवजड वाहने मात्र निर्धास्तपणे धावत आहेत. अनेक वाहनांवर नंबर प्लेट नसणे, क्षमतेपेक्षा जास्त मालवाहतूक, तसेच धोकादायक वेगाने वाहन चालवले जात असतानाही त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचा आरोप आहे. मोठ्यांना मोकळीक आणि छोट्यांवर कारवाई असा दुहेरी न्याय का, असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

अपघाताला आमंत्रण देणाऱ्या या अवैध वाहतुकीकडे दुर्लक्ष करून केवळ हेल्मेट, कागदपत्रे किंवा किरकोळ कारणांवर सामान्य नागरिकांकडून दंड वसूल केला जात असल्याचेही बोलले जात आहे. अनेक कष्टकरी कामावर जाताना अडवले जात असून, उशीर झाल्यामुळे रोजंदारी बुडत असल्याचे वास्तव समोर येत आहे. दरम्यान, नागरिकांकडून मागणी होत आहे की प्रशासनाने तातडीने लक्ष घालून अवैध व अवजड वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, तसेच सामान्य जनतेला वेठीस धरणारी ही एकतर्फी दंड मोहीम थांबवावी. नियम सर्वांसाठी समान असावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत असून मोठ्या वाहनांवरही तितक्याच कडकपणे कारवाई व्हावी, अशी ठाम भूमिका नागरिक घेत आहेत.

दरम्यान, या सगळ्या प्रकारामुळे पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात पोलीस म्हणजे संरक्षण की दंड वसुली यंत्रणा? असा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास स्थानिक नागरिक आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे.

### जीव धोक्यात घालणारी अवैध प्रवासी वाहतूक!

रिक्षा व सहा–सीटर वाहनांतून सर्रास धोकादायक प्रवासी वाहतूक सुरू आहे. नियमांनुसार रिक्षामध्ये केवळ तीन प्रवाशांना परवानगी असताना प्रत्यक्षात ८ ते १० प्रवासी कोंबले जात आहेत. सहा–सीटर वाहनांत तर ११ ते १२ प्रवासी भरून वाहतूक केली जात असल्याचे वास्तव समोर आले आहे. हडपसर ते वरवंड दरम्यान खुलेआम अवैध प्रवासी वाहतूक सुरु असून, या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष केले जात असताना सामान्य दुचाकीस्वारांवर मात्र कारवाईचा बडगा उगारला जात असल्याचे चित्र आहे. नागरिकांच्या मते, ही स्थिती तातडीने आटोक्यात न आणल्यास भविष्यात मोठ्या अपघातांची शक्यता नाकारता येत नाही.

## हडपसरमधील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस; दोघांना अटक तर ६ गुन्ह्यांची उकल

अमित मुंडीक

पुणे, ता. १४ : हडपसर परिसरातील मोटारसायकल चोरीच्या मालिकेचा उलगडा करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट-६ पथकाला यश आले आहे. या कारवाईत एका विधीसंघर्षित बालकासह दोन तरुणांना ताब्यात घेण्यात आले असून एकूण सहा गुन्हे उघडकीस आले आहेत.

२९ जानेवारी २०२६ रोजी हडपसर पोलीस ठाणे येथे मोटारसायकल चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्यानंतर तपास सुरू असताना बापुराव तुकाराम तुपे चौक, अमनोरा पार्क सोसायटी मागे दोन संशयित व्यक्ती चोरीच्या दुचाकीसह थांबले असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.




त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून एक विधीसंघर्षित बालक तसेच पवन तानाजी माने (वय २२, रा. लोहगाव, पुणे) आणि प्रतीक शिवाजी अस्वरे (वय २०, रा. माढा, जि. सोलापूर) यांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी हडपसर, दिघी आणि चंदननगर परिसरातून विविध ठिकाणांहून मोटारसायकली चोरल्याची कबुली दिली.

अधिक तपासात विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेले एकूण सहा गुन्हे उघडकीस आले. आरोपींकडून दोन अतिरिक्त मोटारसायकलींसह सुमारे सात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई अप्पर पोलीस आयुक्त पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त (गुन्हे) निखील पिंगळे आणि सहायक पोलीस आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड आणि त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास सुरू आहे.

## लॉकअपमधून आरोपीचे पळून गेल्याने पोलीस हवालदार निलंबित

**पुणे, ता. १४ :** पोक्सो प्रकरणात अटकेत असलेल्या आरोपीने चादर मागितल्यानंतर त्याला लॉकअपमधून बाहेर काढून बाथरूममधून चादर आणण्यास पाठविण्यात आले. याच संधीचा फायदा घेत आरोपीने बाथरूमच्या खिडकीच्या काचा काढून पलायन केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणात कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी येरवडा पोलीस ठाणे येथील पोलीस हवालदार सचिन शिंदे यांना निलंबित करण्यात आले आहे. निलंबनाची कारवाई पोलीस उपायुक्त चिलुमुला रजनीकांत यांनी केली.

घटना ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सुमारे पावणे आठ वाजण्याच्या सुमारास येरवडा पोलीस ठाण्यातील कोठडीत घडली.




शैलेश राजू मोहिते (वय १८, रा. राज चौक, येरवडा) याला पोक्सो गुन्ह्यात ५ फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली होती. न्यायालयाने त्याला १० फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती.

८ फेब्रुवारी रोजी रात्री गार्ड ड्युटीवर पोलीस हवालदार शिंदे यांच्यासह विमानतळ पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार हनवते हे कार्यरत होते. आरोपी मोहिते याने चादरीची मागणी केली असता, नियमानुसार चादर देणे अपेक्षित असताना त्याला लॉकअपमधून बाहेर काढून बाथरूमकडील जागेतून चादर घेण्यास पाठविण्यात आले. आरोपीसोबत पोलीस कर्मचारी जाणे आवश्यक असताना त्याला एकट्याने पाठविण्यात आले आणि त्याकडे दुर्लक्ष झाल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे.

याच दरम्यान आरोपीने बाथरूमच्या खिडकीच्या काचा काढून पलायन केले. आरोपी फरार झाल्यानंतर येरवडा पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लॉकअपमधील आरोपीवर सतत निगराणी ठेवणे आवश्यक असताना कोणतीही सुरक्षिततेची खबरदारी न घेता कर्तव्यात कसूर झाल्याने पोलिस दलाची प्रतिमा मलिन झाल्याचे नमूद करत पोलीस उपायुक्तांनी संबंधित हवालदाराला निलंबित केले आहे. घटनेचा पुढील तपास सुरू असून फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

## शरद पवार पुन्हा राज्यसभेवर जाणार? संजय राऊत काय म्हणाले?

**मुंबई, ता. १४ :** महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या घडामोडींना वेग आला असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील संभाव्य विलिनीकरणाच्या चर्चांबरोबरच राज्यसभेच्या निवडणुकीकडेही लक्ष वेधले जात आहे. एप्रिल महिन्यात सात राज्यसभा सदस्यांचा कार्यकाळ संपणार असून, त्यामध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांचाही समावेश आहे. त्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा राज्यसभेवर जावे, अशी मागणी राजकीय वर्तुळात जोर धरू लागली आहे.



दरम्यान, शिवसेना (उबाठा) चे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधताना महत्त्वपूर्ण विधान केले. राज्यसभेतील रिक्त होणाऱ्या जागांबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, एप्रिलमध्ये काही जागा रिक्त होत असून महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचा एकत्रित विचार करता केवळ एकच उमेदवार निवडून जाऊ शकतो. तिन्ही पक्षांचे काही सदस्य निवृत्त होत असल्याने या संदर्भात सर्व पक्षांचे नेते एकत्र बसून निर्णय घेतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

शरद पवार यांच्या भूमिकेबाबत बोलताना राऊत म्हणाले की, त्यांनी अलीकडेच पवार यांच्याशी चर्चा केली होती. त्या वेळी पवार यांनी पुन्हा राज्यसभेची निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली असल्याचे त्यांनी सांगितले. या मुद्द्यावर महाविकास आघाडीत चर्चा सुरू असून पवार यांनी आपली भूमिका काँग्रेसलाही कळवली आहे, असेही राऊत यांनी नमूद केले. ६० वर्षांहून अधिक संसदीय अनुभव असलेल्या शरद पवार यांच्या संभाव्य उमेदवारीमुळे राज्यसभेच्या निवडणुकीकडे राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे. महाविकास आघाडीतील चर्चेनंतर पुढील रणनीती निश्चित होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# शिवजयंतीनिमित्त जय भवानी ग्रुपच्या माध्यमातून सांस्कृतिक पर्वणी!

## लोणी काळभोरमध्ये अवधूत गांधींचा लाईव्ह कार्यक्रमासह भव्य रांगोळी स्पर्धा

**लोणी काळभोर, ता. १४ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील जय भवानी ग्रुपच्या शिवप्रेमी तरुणांकडून यंदाची शिवजयंती सामाजिक उपक्रमांसह उत्साहात साजरी केली जाणार आहे. या निमित्ताने गुरुवार, १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता पाषाणकर बाग येथे महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक व संगीतकार अवधूत गांधी यांनी शेर शिवराज, फत्तेशिकस्त, सुबेदार, पावनखिंड या चित्रपटांना संगीत दिले आहे. त्यांचा लाईव्ह संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तसेच बुधवारी (ता. १८ फेब्रुवारी) सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत महिलांसाठी भव्य रांगोळी




स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आयोजक ॲड. श्रीयश राहुल काळभोर यांनी दिली.

स्त्री सन्मान, शिक्षण आणि समाजप्रबोधन हा छत्रपती शिवाजी महाराज यांचा विचार आजही प्रेरणादायी आहे. एक माता शिकली, तर संपूर्ण कुटुंब शिकते या महाराजांच्या संदेशाचा वारसा जय भवानी ग्रुप जपत आहे.

मागील सहा वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवून शिवजन्मोत्सव साजरा केला जात आहे. महाराजांचे विचार समाजापर्यंत पोहोचवण्याचे कार्य सातत्याने सुरू असून दरवर्षी वेगळ्या सामाजिक उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपली जाते. गेल्या वर्षी तब्बल १५० विद्यार्थिनींना प्रत्येकी ३ हजार रुपयांची शिष्यवृत्ती तसेच वर्षभराचे शालेय साहित्य देण्यात आले होते. दरम्यान, रांगोळी स्पर्धेसाठी नावनोंदणीसाठी निलेश काळभोर (७९७२०४१२१२), विनय वजरीनकर (९६१५१५७००१) व भार्गव दौंडकर (८७८८८१७६२१) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन जय भवानी ग्रुप व मित्रपरिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर संगीत, कला आणि समाजसेवेचा संगम साधणारा हा उपक्रम नागरिकांसाठी खास आकर्षण ठरणार आहे.

**स्पर्धेचे प्रमुख नियम**

१) स्पर्धा पूर्णतः विनामूल्य
२) देव, महापुरुष, नेते, संत किंवा ऐतिहासिक व्यक्तींची रांगोळी काढण्यास मनाई
३) स्पर्धा फक्त लोणी काळभोर व कदमवाकवस्ती गावांपुरती मर्यादित
४) परिक्षकांचा निर्णय अंतिम
५) आवडत्या विषयावर रांगोळी काढण्यास मुभा
६) एका रांगोळीसाठी एकच स्पर्धक ग्राह्य
७) सर्व वयोगटातील महिला सहभागी होऊ शकतात
८) आवश्यक साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणणे बंधनकारक
९) दिलेल्या वेळेत उपस्थित राहून ठराविक वेळेत रांगोळी पूर्ण करणे आवश्यक

## संक्षिप्त



### सिंहगड रोड परिसरात कारची तोडफोड करणाऱ्या चार आरोपींना अटक

**पुणे, ता. १४ :** धारदार लोखंडी हत्याराने दोन इसमांवर प्राणघातक हल्ला करून गंभीर जखमी करणाऱ्या तसेच कारच्या काचा फोडून दहशत माजवणाऱ्या गुन्हेगारांना सिंहगड रोड पोलिसांनी अटक केली आहे. महालक्ष्मी मंदिरासमोर, पीएमसी शाळेजवळ, वडगाव बुद्रुक येथे ५ ते ६ इसमांनी सुझुकी फ्रॉन्क्स कारची तोडफोड करून कारमधील दोघांवर हल्ला केला होता. या प्रकरणी सिंहगड रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी अमन अंबीर झारेकरी (२२), निशांत राजेश राऊत (२४), सुमित अनिल माने (२२) व स्वप्निल चंद्रकांत गायकवाड (२०) यांना अटक करण्यात आली असून एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान, आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेले एक दुचाकी वाहन व तीन धारदार लोखंडी हत्यारे जप्त करण्यात आली आहेत. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भुपेश साळुंके करीत असून ही कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.


# लोकवर्गणीतून पळसनाथ मंदिराला नवी झळाळी, रंगरंगोटीमुळे मंदिराचे सौंदर्य खुलले

**संतोष पवार**

इंदापूर, ता. १४ : प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पळसदेव (ता. इंदापूर) येथील ग्रामदैवत श्री पळसनाथ मंदिर आज आकर्षक रंगरंगोटीमुळे नव्या तेजात उजळून निघाले आहे. मंदिरावरील नाजूक कोरीव नक्षीकामात विविध रंग भरल्याने संपूर्ण वास्तू अधिकच उठावदार दिसू लागली असून, भाविकांसह ग्रामस्थांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण पसरले आहे.

उजनी धरण प्रकल्पामुळे गावाचे पुनर्वसन झाल्यानंतर जुन्या पळसनाथ मंदिरातील शिवलिंग नव्या गावठाणात उभारलेल्या मंदिरात विधिवत प्रतिष्ठापित करण्यात आले. मंदिराचे स्थान बदलले असले, तरी ग्रामस्थांची भगवान शिव यांच्यावरील श्रद्धा आजही तितकीच दृढ आहे. दररोज सकाळ-संध्याकाळ येथे आरती, पूजा-अर्चा होत असून, श्रावण, महाशिवरात्र यांसारख्या सण-उत्सवांच्या काळात मंदिर परिसर भक्तांनी गजबजून जातो.

सन १९८६ ते १९८८ या कालावधीत उभारण्यात आलेल्या या मंदिराचे शिखर दक्षिण भारतीय द्रविड (गोपुरम) शैलीचे आहे. बहुमजली, टप्प्याटप्प्याने वर जाणाऱ्या या भव्य शिखरावर सुमारे १४४ रंगीत मूर्ती, अत्यंत नाजूक कोरीवकाम आणि आकर्षक रंगसंगती पाहायला मिळते. गणेश, विष्णू, देवी, शिवपरिवार अशा विविध देव-देवतांच्या प्रतिमा प्रत्येक स्तरावर कोरलेल्या असून, सर्वात वर सुवर्ण कलश विराजमान आहे. हा कलश गावाच्या समृद्धी व पूर्णत्वाचे प्रतीक



मानला जातो. सुमारे ५१ फुट उंचीचे हे शिखर भक्तांना ईश्वराकडे पाहण्यास व आत्मिक शांततेचा अनुभव घेण्यास प्रेरित करते.

सध्या मंदिराचे संपूर्ण रंगकाम ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून सुरू आहे. अंदाजे ८ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असताना, ग्रामस्थांनी सढळ हाताने मदत केल्यामुळे आतापर्यंत सुमारे ९ लाख रुपये वर्गणी जमा झाली आहे. या निधीतून केवळ रंगरंगोटीच नव्हे, तर मंदिर परिसरात हिरवळ वाढवण्यासाठी सुंदर बगीचा विकसित केला जाणार आहे. त्यामुळे भविष्यात भाविकांना शांत, स्वच्छ व रमणीय वातावरण लाभणार आहे.

या उपक्रमात तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक सर्वांनीच उत्स्फुर्त सहभाग नोंदवला आहे. कुणी आर्थिक मदत केली, कुणी प्रत्यक्ष कामात हातभार लावला, तर कुणी नियोजन व देखरेखीची जबाबदारी घेतली. त्यामुळे हा उपक्रम केवळ धार्मिक नसून सामाजिक एकात्मतेचेही उत्तम उदाहरण ठरत आहे. गावकऱ्यांच्या एकजुटीमुळेच हे काम अपेक्षेपेक्षा वेगाने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्णत्वाकडे जात आहे.

दरम्यान, लोकसहभागातून साकारलेले हे रंगकाम केवळ मंदिराचे सौंदर्य वाढवत नाही, तर पळसदेव ग्रामस्थांच्या श्रद्धा, एकजूट आणि सांस्कृतिक वारशाचेही जिवंत दर्शन घडवते. भविष्यात येथे अधिक धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम राबवण्याचा ग्रामस्थांचा मानस असून, पळसनाथ मंदिर हे परिसरातील एक प्रमुख श्रद्धास्थान म्हणून अधिकच नावारूपाला येणार आहे.

#### ठळक बाबी

* ग्रामदैवत श्री पळसनाथ मंदिर बांधणी : १९८६१९८८
* मंदिरासाठी पणदरे येथून पाषाण दगड आणण्यात आला
* शिखरावर नाजूक कलाकुसर व आकर्षक १४४ मूर्तींचा समावेश
* देवस्थान मालकीची जमीन धरणात गेल्यानंतर मिळालेल्या मोबदल्यातून मंदिराचे काम पूर्ण
* मंदिराची उंची : सुमारे ५१ फुट
* आतापर्यंत जमा लोकवर्गणी : अंदाजे ९ लाख रुपये
* रंगरंगोटीसाठी मजुरी : सुमारे २ लाख
* रंग खरेदी : सुमारे ६ लाख
* लवकरच मंदिर परिसरात बगीचा विकसित केला जाणार



## भारत–पाकिस्तानचा आज महासंग्राम

पुणे, ता. १४ वाद, चर्चा आणि अनिश्चिततेच्या छायेनंतर अखेर क्रिकेटविश्वाची नजर खिळवून ठेवणारा भारत-पाकिस्तान सामना रंगणार आहे. आज (रविवारी, १५ फेब्रुवारी) रोजी गट टप्प्यातील ही बहुप्रतीक्षित लढत पार पडणार आहे. दोन्ही संघांसाठी हा तिसरा सामना असून, विजय मिळवणाऱ्या संघाला पुढील फेरीचे तिकीट जवळपास निश्चित होणार आहे. त्यामुळे सामना करो या मरो स्वरूपाचा ठरणार आहे.

बहिष्कारानंतर तिढा सुटला काही दिवसांपूर्वी बांगलादेश स्पर्धेबाहेर गेल्यानंतर पाकिस्तानने भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची भूमिका जाहीर केली होती. यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट वर्तुळात खळबळ उडाली. चर्चांच्या फेऱ्यांनंतर अखेर पाकिस्तानने बहिष्कार मागे घेतला आणि सामन्याचा मार्ग मोकळा झाला.

**सामना कधी आणि कुठे?**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथील आर. प्रेमदासा स्टेडियम येथे होणार आहे.

नाणेफेक : सायं. ६.३० (भारतीय वेळेनुसार)

सामना सुरू: सायं. ७.००

थेट प्रक्षेपण कुठे पाहता येईल?

भारतामध्ये सामना स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर थेट प्रसारित केला जाईल. ऑनलाइन स्ट्रीमिंगसाठी Disney+ Hotstar ॲप आणि वेबसाइटवर प्रेक्षकांना सामना पाहता येणार आहे.

भारतीय संघ : सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, संजू सॅमसन, शिवम दुबे, इशान किशन, हार्दिक पांड्या, रिंकू सिंग, अक्षर पटेल, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, वॉशिंग्टन सुंदर.

पाकिस्तान संघ : सलमान अली आगा (कर्णधार), अबरार अहमद, बाबर आझम, फहीम अश्रफ, फखर जमान, ख्वाजा मोहम्मद नफे, मोहम्मद नवाज, मोहम्मद सलमान मिर्झा, नसीम शाह, साहिबजादा फरहान, सईम अयुब, शाहीन शाह आफ्रिदी, शादाब खान, उस्मान खान, उस्मान तारिक.

जागतिक क्रिकेटमधील दोन कट्टर प्रतिस्पर्धी पुन्हा एकदा आमनेसामने येत असल्याने चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. कोलंबोतील हा सामना स्पर्धेचा टर्निंग पॉइंट ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## थेऊर येथील अपघातात जखमी झालेल्या मुलाचा उपचारादरम्यान मृत्यू; दोघांवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. १४ :** ओव्हरटेक करण्याच्या नादात दोन ट्रक व कारचा अपघात झाल्याची घटना घडली होती. ही घटना थेऊर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील गणेश वाडी परिसरात ७ फेब्रुवारीला पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली होती. या अपघातात कारमधील तिघेजण जखमी झाले होते. या जखमींपैकी एका १५ वर्षाच्या मुलाचा ससून रुग्णालयात उपचारादरम्यान शुक्रवारी (ता.१३) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास मृत्यू झाला आहे.

विर राहुल सावंत (वय- १५) असे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. तर या अपघातात यश अजित सावंत (वय २०) व महेश बसवराज पुजारी (वय २२, रा. चव्हाण वस्ती,



थेऊर) हे किरकोळ जखमी झाले होते. याप्रकरणी महेश पुजारी यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गोटु कचरु वारे (वय २३, पांगरी मारुतीची ता शिरुर जि बिड) व मोहसीन लालामियाँ सय्यद (वय- ४६, पत्ता स्टार फंक्शन हॉलजवळ, हुमनाबाद जि बिदर राज्य कर्नाटक) या दोन चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महेश पुजारी हे त्याच्या मालकाच्या ह्युंडाई वेरणा कारने मित्र यश सावंत आणि वीर सावंत यांच्यासह थेऊर फाट्याकडे जात होते. त्यावेळी समोरून येणारी अशोक लेलंड कंपनीची १६ टायर ट्रक रस्त्याच्या मधोमध धावत होती. वारंवार अप्पर-डिप्पर देऊनही ट्रकचालकाने दुर्लक्ष केले.

याच क्षणी मागून येणाऱ्या सहा टायर ट्रकने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला आणि त्या ट्रकचा मागील भाग थेट वर्ना कारला धडकला. धडकेनंतर कार गोल फिरत रस्त्यालगतच्या झाडावर आदळून खड्ड्यात कोसळली. कारचे चारही टायर व संपूर्ण बॉडीचे मोठे नुकसान झाले.

या अपघातात महेश पुजारी यांना किरकोळ दुखापत झाली, तर मागील सीटवर बसलेल्या वीर सावंतच्या डोक्याला गंभीर मार लागला होता. स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदत करत वीरला लोणी काळभोर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले, मात्र पुढील उपचारासाठी ससून रुग्णालय येथे हलविण्यात आलेल्या वीरचा शुक्रवारी (ता. १३) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास उपचारादरम्यान मृत्यू झाला. दरम्यान, या हृदयद्रावक घटनेमुळे थेऊर परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अवजड वाहनांच्या बेफिकीर वाहतुकीवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## धोम–बलकवडी कालव्यात तरंगताना दिसला मृतदेह

**भोर, ता. १४ :** पुणे जिल्ह्यातील भोर तालुका हादरवणारी घटना समोर आली आहे. चिखलगाव रावडी गावाच्या हद्दीत असलेल्या धोमबलकवडी धरणाच्या डाव्या कालव्यात ३० ते ३५ वर्षांच्या महिलेचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. मृत महिलेची ओळख राधिका सुरेश सावंत अशी पटली आहे.

स्थानिक नागरिकांना कालव्यातून मृतदेह वाहून जाताना दिसल्यानंतर त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर भोर पोलीस ठाणे चे पथक घटनास्थळी दाखल झाले. ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आला. प्राथमिक तपासात मृतदेहाजवळील पुरावे आणि स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार महिलेची ओळख निश्चित करण्यात आली.

मृत्यू नेमका कशामुळे झाला याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. आत्महत्येचा प्रकार आहे की अन्य काही घडले, याचा तपास सुरू आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून वैद्यकीय अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

धरण आणि कालव्यांच्या परिसरात सुरक्षिततेचे प्रश्न वारंवार उपस्थित होत असताना ही घटना चिंतेची ठरली आहे. स्थानिक प्रशासनाने कालव्यांच्या कडेला सुरक्षेची उपाययोजना आणि दक्षता वाढवण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू असून अधिकृत निष्कर्षाची प्रतीक्षा आहे.



## वाकडेवाडी बसस्टॅन्ड परिसरातील चोरी उघडकीस

**अमित मुंडीक**

पुणे, ता. १४ : वृद्ध इसमास रिक्षामधून सोडण्याच्या बहाण्याने त्याच्या सामानातील रोख रक्कम चोरी करणाऱ्या आरोपीस गुन्हे शाखेच्या युनिट चारच्या पोलिसांनी अटक करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. खडकी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३४ अन्वये दाखल गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्याचे आदेश वरिष्ठांकडून देण्यात आले होते. पोलिसांचे पथक खडकी हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पोलीस अंमलदार सुभाष आव्हाड व किशोर दुशिंग यांना गोपनीय माहिती मिळाली की, वाकडेवाडी बसस्टॅन्ड परिसरात चोरी करणारा इसम रिक्षा (एमएच/१२/एचसी/४१०७) घेऊन येणार आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांचन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचून रिक्षा थांबविण्यात आली. चौकशीत आरोपी इदरीश शफिक शेख (वय ३६, रा. बावधान, पुणे; मुळ रा. बिजनौर, उत्तरप्रदेश) असल्याचे निष्पन्न झाले.

विश्वासात घेऊन चौकशी केली असता आरोपीने साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिली. दोन पंचांसमक्ष झडती घेतली असता चोरीस गेलेल्या रकमेपैकी २४,५०० रुपये रोख व गुन्ह्यात वापरलेली रिक्षा असा एकूण १,४९,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील तपासासाठी आरोपीस खडकी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## ट्रिपल सीटवर ब्रेक! पुणे वाहतूक पोलिसांकडून २६४९ वाहनांवर कारवाई

**अमित मुंडीक**

पुणे, ता. १४ : दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास करणाऱ्यांविरोधात पुणे वाहतूक पोलीस विभागाने १२ व १३ फेब्रुवारी रोजी शहरभर विशेष संयुक्त मोहीम राबवली. वाहतूक शाखा आणि सर्व पोलीस स्टेशनच्या सहभागातून प्रमुख रस्ते, चौक तसेच वर्दळीच्या ठिकाणी एकाचवेळी कडक कारवाई करण्यात आली.

या दोन दिवसांच्या विशेष मोहिमेत तब्बल २६४९ ट्रिपल सीट वाहनांवर कारवाई करण्यात आली. यापैकी ९८८ वाहने जप्त करण्यात आली असून २१३७ वाहनचालकांनी चलन तत्काळ भरले. या कारवाईतून शासनाकडे २१ लाख ३७ हजार इतकी रक्कम जमा झाली आहे. याशिवाय एकूण १३ हजार ३०८ चलनांवरही कारवाई करण्यात आली.



दरम्यान, १० फेब्रुवारी पासून आजपर्यंत ट्रिपल सीटसह इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५३८० वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून १ कोटी ३ लाख २५ हजार १५० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. या विशेष मोहिमेत शहरातील ३० वाहतूक विभाग आणि ४४ पोलीस स्टेशन येथील अधिकारी व अंमलदारांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

वाहतूक पोलिसांनी स्पष्ट केले की, दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास हा कायद्याने दंडनीय गुन्हा असून त्यामुळे अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. नागरिकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून सुरक्षित व शिस्तबद्ध वाहनचालना करावी. शहरातील वाहतूक सुरळीत ठेवणे आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी अशा विशेष मोहिमा पुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचेही वाहतूक शाखेकडून सांगण्यात आले आहे.

## टिपू सुलतान शिवाजी महाराजांच्या समकक्ष : हर्षवर्धन सपकाळ

**बुलढाणा, ता. १४ :** काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतान यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी करत केलेल्या विधानामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. मालेगाव महानगरपालिकेतील उपमहापौरांच्या दालनात टिपू सुलतान यांचे छायाचित्र लावल्याच्या वादाच्या पार्श्वभूमीवर सपकाळ यांच्या वक्तव्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.

बुलढाणा येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना सपकाळ म्हणाले की, ज्या प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्याचा विचार दिला, त्याच धर्तीवर टिपू सुलतान यांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे आणि देशासाठी लढणारे भूमिपुत्र होते. त्यांनी कोणत्याही विषारी विचारांना जवळ केले नाही. त्यामुळे शौर्याच्या



दृष्टीने त्यांना शिवाजी महाराजांच्या समकक्ष पाहिले पाहिजे, असे ते म्हणाले.

सपकाळ यांच्या या विधानावर भाजप नेत्यांनी तीव्र टीका केली आहे. दरम्यान, सपकाळ यांनी राज्यातील सत्ताधाऱ्यांवरही निशाणा साधला. नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील ५० हजारांच्या लाच प्रकरणाचा उल्लेख करत त्यांनी संपूर्ण सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. झिरवाळ यांच्यावर कारवाई झाली पाहिजेच; पण कोट्यवधी रुपयांच्या आरोपांवर देवेंद्र फडणवीस त्यांच्यावर काय कारवाई करणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सपकाळ यांच्या विधानामुळे राज्यातील राजकारणात नवा वाद निर्माण होण्याची चिन्हे असून, येत्या काही दिवसांत या मुद्द्यावरून आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू राहण्याची शक्यता आहे.

## झारगडवाडी येथील दीपाली निकम यांची कृषी अधिकारीपदी निवड

**गोरख जाधव**

डोर्लेवाडी, ता. १४ : बारामतीतालुक्यातीलझारगडवाडी येथील दीपाली विजयकुमार निकम हिने ग्रामीण पार्श्वभूमीवरून स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत राज्य सेवेत झेप घेतली आहे. 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगा' मार्फत घेण्यात आलेल्या कृषी सेवा स्पर्धा परीक्षेत राज्यात ४९ वा क्रमांक मिळवत तिची कृषी अधिकारीपदी निवड झाली आहे. तिच्या या यशामुळे झारगडवाडी गावासह बारामती तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

आयोगाने जाहीर केलेल्या अंतिम निकालानुसार, दीपालीने पहिल्याच प्रयत्नात पूर्व परीक्षा,



मुख्य परीक्षा आणि मुलाखत हे तिन्ही टप्पे यशस्वीरीत्या पार केले. विशेष म्हणजे कोणत्याही खासगी मार्गदर्शनाविना केवळ स्वअभ्यासाच्या बळावर तिने हे यश मिळवले. दररोज १० ते १२ तासांचा नियोजनबद्ध अभ्यास, सातत्य आणि जिद्द हे तिच्या यशामागील प्रमुख घटक ठरले.


दीपालीचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, झारगडवाडी येथे झाले. माध्यमिक शिक्षणासाठी तिने बारामतीतील एम. एस. सो. विद्यालयात प्रवेश घेतला. पुढे विद्या प्रतिष्ठानच्या महाविद्यालयातून बारावी पूर्ण केल्यानंतर शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालय, बारामती येथून तिने कृषी पदवी प्राप्त केली. त्यानंतर महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे वनस्पती रोगशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

वडील विजयकुमार निकम हे शेतकरी तर आई गृहिणी आहेत. लहानपणापासून प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या दीपालीने कुटुंबाच्या पाठिंब्याने आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर हे ध्येय साध्य केले. ग्रामीण भागातून येत स्पर्धा परीक्षेत मिळवलेले हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. दिलापीने मिळविलेल्या यशाबद्दल झारगडवाडी ग्रामस्थांनी सत्कार करून अभिनंदनाचा वर्षाव केला. फटाक्यांची आतिषबाजी करत गावकऱ्यांनी आनंद साजरा केला.

#### शेतकऱ्यांसाठी काम करण्याची बांधिलकी

मी याच शिवारात वाढले. शेतकऱ्यांचे कष्ट जवळून पाहिले आहेत. त्यामुळे कृषी अधिकारी म्हणून काम करताना माझे पहिले प्राधान्य आपल्या मातीला आणि शेतकऱ्याला असेल. शासनाच्या विविध कृषी योजना खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन, अशी भावना दीपाली निकम हिने व्यक्त केली.

# विमा कंपनीनं हात वर केले, पण पुणेकर महिलेनं झुकवलंच!



**पुणे, ता. १४ :** मोबाईल विम्याच्या अटींचा आधार घेत ग्राहकाचा दावा फेटाळणाऱ्या विमा कंपनीला पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने चांगलाच दणका दिला आहे. विम्याचा लाभ एकदाच घेता येतो हा कंपनीचा युक्तिवाद फेटाळून आयोगाने संबंधित ग्राहकाला नवीन आयफोन द्यावा किंवा ८९,००० रुपये ४ टक्के व्याजासह परत करावेत, असा आदेश दिला आहे. तसेच मानसिक त्रास आणि तक्रार खर्चापोटी अतिरिक्त १३,००० रुपये देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

धायरी येथील एका महिलेने कोथरूडमधून ८९,००० रुपये किंमतीचा आयफोन एक्स खरेदी केला होता. फोनच्या संरक्षणासाठी त्यांनी १५,००० रुपये भरून विमा पॉलिसी घेतली. काही दिवसांतच फोन खाली पडून कॅमेऱ्याचे नुकसान झाले. पहिल्या दाव्यानंतर विमा कंपनीने फोन बदलून दिला. मात्र दुसऱ्यांदा फोन बिघडल्यावर कंपनीने विम्याचा लाभ फक्त एकदाच मिळतो असे सांगत दावा नाकारला.

याविरोधात महिलेने सप्टेंबर २०१८ मध्ये पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग येथे तक्रार दाखल केली. ग्राहकाच्या वतीने ॲड. श्रीराम करंदीकर यांनी बाजू मांडली. आयोगाचे अध्यक्ष अनिल जवळेकर आणि सदस्या शुभांगी दुनाखे यांनी दिलेल्या निरीक्षणात स्पष्ट केले की, पॉलिसीत एकदाच लाभ लागू होतो अशी स्पष्ट लेखी अट नव्हती. केवळ एकदा दुरुस्ती किंवा बदल करून पॉलिसी संपली असे गृहित धरता येत नाही.

२०१८ पासून सुरू असलेल्या या कायदेशीर लढ्याला तब्बल ७ वर्षांनंतर यश मिळाले. या निर्णयामुळे विमा कंपन्यांनी अटी-शर्तींचा मनमानी अर्थ लावू नये, असा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. ग्राहकांनी विमा पॉलिसी घेताना अटी नीट वाचाव्यात, तर कंपन्यांनीही पारदर्शकता राखावी, असे या निकालातून अधोरेखित झाले आहे.

# मुंबईत मेट्रोचं काम जीवावर बेतलं; सरपंचांचा दुर्दैवी अंत, सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह!



**मुंबई, ता. १४ :** देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई शहरात सुरू असलेल्या वेगवान पायाभूत विकासकामांमुळे नागरिकांचा जीव धोक्यात येत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. मुलुंड पश्चिम परिसरात शुक्रवारी (१४ फेब्रुवारी) दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडलेल्या भीषण दुर्घटनेने संपूर्ण शहर हादरले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत सुरू असलेल्या मुंबई मेट्रो लाईन ४ च्या उड्डाणपुलाच्या कामादरम्यान पॅरापेटचा मोठा काँक्रीट भाग अचानक खाली कोसळला. हा अवजड तुकडा थेट रस्त्यावरून जाणाऱ्या ऑटो रिक्षावर आदळल्याने क्षणार्धात भीषण दृश्य निर्माण झाले. ही घटना एलबीएस रोडवरील अग्निशमन केंद्राजवळ, पियर क्रमांक पी १९६ परिसरात घडली.

या अपघातात उत्तर प्रदेशातील जौनपूर जिल्ह्यातील सरपंच रामधनी यादव यांचा जागीच मृत्यू झाला. ते मुंबईत मित्राला भेटण्यासाठी तसेच नातेवाईकांच्या लग्नसमारंभासाठी आले होते. त्यांच्या सोबत प्रवास करणारे माजी सरपंच महेंद्र यादव व अन्य प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पाहुणचारासाठी आलेल्या व्यक्तींचा प्रवास अशा दुर्दैवी शेवटाला लागेल, याची कल्पनाही कुणी केली नव्हती.

घटनेनंतर पोलिस, अग्निशमन दल व एमएमआरडीएच्या पथकाने तातडीने मदतकार्य सुरू केले. मात्र या दुर्घटनेमुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. वर्दळीच्या रस्त्यावर सुरू असलेल्या अशा प्रकल्पांदरम्यान खालील वाहतुकीसाठी पुरेशी सुरक्षा व्यवस्था का नव्हती? संरक्षक जाळ्या, बॅरिकेड्स, तसेच नियमित सेफ्टी ऑडिट प्रत्यक्षात कितपत काटेकोरपणे राबवले जात आहेत, यावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया देताना काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी विकासाच्या नावाखाली नागरिकांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. मुंबईकरांचा जीव इतका स्वस्त झाला आहे का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

दरम्यान, एमएमआरडीएकडून दुर्घटनेची चौकशी जाहीर करण्यात आली असून जबाबदार कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत. मात्र केवळ चौकशी करून प्रश्न सुटणार का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

मुंबईत मेट्रो, रस्ते रुंदीकरण आणि उड्डाणपूल अशा प्रकल्पांचा वेग वाढत असला, तरी त्याच वेगाने सुरक्षा यंत्रणा मजबूत होणे तितकेच आवश्यक आहे. अन्यथा विकास हा शब्द सामान्य नागरिकांच्या जीवावर उठणारा ठरेल. आज रामधनी यादव यांचा बळी गेला आहे; उद्या कुणाचा नंबर लागेल, याची खात्री नाही. त्यामुळे अशा प्रकल्पांमध्ये मानवी जीवाला सर्वोच्च प्राधान्य देत तातडीने कठोर सुरक्षा उपाययोजना राबवण्याची गरज तज्ज्ञ व नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# गोकुळनगर परिसरातील घरफोडी करणाऱ्या आरोपीला अटक; १६ लाखांचा मुद्देमाल जप्त




**पुणे, ता. १४ :** कात्रजकोंढवा रोडवरील गोकुळनगर परिसरातील घरफोडीचा गुन्हा उघड करत पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली असून सुमारे १६ लाख ६५ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विशेष म्हणजे, संशयिताचा चेहरा सीसीटीव्हीत दिसल्यानंतर फिर्यादीनेच हा तर माझ्या ओळखीचा आहे असे सांगितल्याने तपासाला निर्णायक वळण मिळाले.

जिजाप्पा आजिनाथ देवकाते (वय ६५) यांनी येवलेवाडी पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली होती. २ ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचा कडीकोयंडा उचकटून प्रवेश केला. बेडरूममधील कपाट फोडून सोन्याचे दागिने, चांदी व रोख रक्कम असा एकूण २४ लाख ४८ हजार ७५० रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला होता. चोरी नेमकी कधी झाली हे सुरुवातीला स्पष्ट नव्हते.

तपासासाठी दरोडा व वाहनचोरी विरोधी पथकाने चार दिवसांचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातून तीन संशयित निष्पन्न झाले. फुटेज फिर्यादीला दाखविल्यानंतर त्यातील एक जण ओळखीचा असल्याचे समोर आले. तांत्रिक विश्लेषण आणि बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी कात्रज येथील पीएमपी बस डेपो परिसरातून कुमार रामचंद्र ठाकर (वय ३८, रा. दत्तनगर, आंबेगाव) याला ताब्यात घेतले.

त्याच्याकडून ११५ ग्रॅम सोन्याचे दागिने, ८०० मिलीग्रॅम चांदीचे दागिने आणि ३५ हजार रुपये रोख असा मोठा ऐवज जप्त करण्यात आला. चौकशीत आरोपीने शेअर मार्केटमधील तोटा आणि कर्जबाजारीपणामुळे गुन्हा केल्याची कबुली दिली. फिर्यादींच्या घरात मौल्यवान वस्तू असल्याची माहिती त्याला आधीपासून असल्याचेही तपासात समोर आले आहे. या गुन्ह्यात त्याचे दोन साथीदार सहभागी असून त्यांचा शोध सुरू आहे.

या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी दिलासा व्यक्त केला असून घरफोडीच्या घटनांमध्ये ओळखीचे व्यक्तीही सामील असू शकतात, याची जाणीव पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# पुण्याच्या एमएमआयटी वसतिगृहात रक्ताच्या चाचण्यांचे रिपोर्ट गायब



**पुणे, ता. १४ :** पुण्यातील लोहगाव परिसरातील मराठवाडा मित्रमंडळ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वसतिगृहात दूषित पाण्यामुळे १२ विद्यार्थिनींना विषबाधा झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. सर्व बाधित विद्यार्थिनींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीवर वैद्यकीय देखरेख ठेवण्यात आली आहे.

विद्यार्थिनींच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही दिवसांपासून वसतिगृहातील फिल्टरमधून पिवळसर आणि दुर्गंधीयुक्त पाणी येत होते. १० फेब्रुवारी रोजी काही विद्यार्थिनींना पाण्याच्या टाकीत आणि बादल्यांमध्ये काळ्या रंगाच्या अळ्या दिसल्याचा दावा करण्यात आला. संबंधित फोटो आणि व्हिडिओ प्रशासनाला दाखवूनही तातडीने प्रभावी उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, असा आरोप विद्यार्थिनींनी केला आहे. जानेवारी महिन्यात तक्रार केल्यानंतर टाकी स्वच्छ केल्याचे सांगण्यात आले, मात्र फिल्टर बदलण्यात आला नव्हता, असेही त्यांचे म्हणणे आहे.

विषबाधेची लक्षणे दिसू लागल्यानंतर काही विद्यार्थिनींना चक्कर येणे, उलट्या होणे आणि अशक्तपणा जाणवू लागला. त्यानंतर त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात विलंब झाल्याचा आरोपही विद्यार्थिनींकडून करण्यात आला आहे.

उपचारादरम्यान रक्त तपासणीचे अहवाल त्वरित न देण्याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. तथापि, या संदर्भात महाविद्यालय प्रशासनाकडून अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. घटनेनंतर पालकांमध्ये संताप व्यक्त होत असून वसतिगृहातील पाणीपुरवठा, स्वच्छता आणि आरोग्य सुरक्षिततेबाबत सखोल चौकशीची मागणी होत आहे.

या घटनेमुळे निवासी शैक्षणिक संस्थांमध्ये मूलभूत सुविधांची गुणवत्ता आणि आरोग्य सुरक्षा मानके काटेकोरपणे पाळली जात आहेत का, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. संबंधित विभागाकडून पाणी नमुन्यांची तपासणी आणि पुढील कारवाई अपेक्षित आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## तुमच्याही कानात सतत शिट्टीसारखा आवाज येतोय? वेळीच व्हा सावध

शांत बसलेले असताना अचानक कानात पीsss, शिट्टी वाजल्यासारखा किंवा घोंगावणारा आवाज येतो? जर तुम्हालाही असा अनुभव येत असेल, तर याला केवळ भ्रम समजून दुर्लक्ष करू नका. वैद्यकीय भाषेत याला टिनिटस असे म्हणतात. सध्याच्या धावपळीच्या आणि आवाजाच्या प्रदूषणात ही समस्या वेगाने वाढत असून, यामुळे मानसिक तणाव आणि बहिरेपणाचा धोका निर्माण होऊ शकतो.

नेमकं काय आहे टिनिटस?

टिनिटस म्हणजे बाहेरून कोणताही आवाज येत नसतानाही कानात विविध प्रकारचे आवाज ऐकूयेणे. हे आवाज दोन्ही कानात किंवा एकाच कानात येऊ शकतात. हा आजार नसून तो शरीरातील किंवा कानातील एखाद्या बिघाडाचे लक्षण आहे.

कानात आवाज येण्याची मुख्य कारणे :

मोठ्या आवाजाचा संपर्क: हेडफोनचा अतिवापर, कारखान्यातील मशीनचा आवाज किंवा डीजेच्या आवाजामुळे कानातील नाजूक पेशींना इजा होते.

कानात मळ साचणे : कानाच्या पडद्याजवळ मळ साचल्याने आवाजाच्या लाटा अडथळा निर्माण करतात.

वाढते वय : वयोमानानुसार कानाची ऐकण्याची क्षमता कमी होते, ज्यामुळे टिनिटसचा त्रास सुरू होऊ शकतो.

रक्तदाब आणि मधुमेह : उच्च रक्तदाब किंवा रक्ताभिसरणातील दोषांमुळे कानाच्या नसांवर ताण येतो.

मानसिक तणाव : अति चिंता किंवा अपुऱ्या झोपेमुळेही कानात आवाज येण्याचे प्रमाण वाढते.

यावर उपाय काय?

तज्ज्ञ डॉक्टरांच्या मते, टिनिटसवर उपचार करताना आधी त्याचे मूळ कारण शोधणे गरजेचे असते.

१. कानाचा मळ काढणे: अनेकदा साध्या क्लिनिंगने हा त्रास दूर होतो.

२. आवाजाची पातळी कमी ठेवा: हेडफोन वापरताना आवाज ५० टक्क्यांपेक्षा कमी ठेवावा.

३. ध्वनी थेरपी : कानाला शांत ठेवण्यासाठी ध्वनी थेरपी केली जाते.

४. योगासने : रक्ताभिसरण सुधारण्यासाठी प्राणायाम आणि योगासने फायदेशीर ठरतात.

# आयर्लंडच्या वादळी विजयाने ओमान संघ स्पर्धेबाहेर; सुपर ८ च्या शर्यतीत प्रचंड खळबळ

**पुणे, ता. १४ :** आयसीसी टी २० वल्ड कप २०२६ चा थरार दिवसागणिक वाढत असताना १५फेब्रुवारीलाहोणाऱ्याभारत विरुद्धपाकीस्थान महामुकाबल्याकडे संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष लागले आहे. मात्र या हायव्होल्टेज लढतीआधीच स्पर्धेत मोठा उलटफेर पाहायला मिळाला असून ओमान नॅशनल क्रिकेट टीम हा पहिला संघ अधिकृतपणे स्पर्धेबाहेर पडला आहे.

शनिवारी (ता. १४) झालेल्या अत्यंत निर्णायक साखळी सामन्यात आयरलंड क्रिकेट टीमने ओमानचा तब्बल ९६ धावांनी धुव्वा उडवत त्यांचे विश्वचषकातील स्वप्न भंग केले. करो या मरो ठरलेल्या या सामन्यात आयर्लंडने पहिल्याच षटकापासून आक्रमक खेळ दाखवत सामना एकतर्फी केला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या आयर्लंडने २० षटकांत ५ गडी गमावून २३५ धावांचा भलामोठा डोंगर उभारला. ही या स्पर्धेतील आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या ठरली. आयरिश फलंदाजांनी चौकार-षटकारांचा पाऊस पाडत ओमानच्या गोलंदाजांची अक्षरशः वाताहत केली. पॉवरप्लेपासून डेथ ओव्हर्सपर्यंत आयर्लंडचे वर्चस्व कायम राहिले.



प्रत्युत्तरात लक्ष्याचा पाठलाग करताना ओमानचा डाव पूर्णपणे कोलमडला. आयर्लंडच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर ओमानचे फलंदाज टिकू शकले नाहीत आणि संपूर्ण संघ अवघ्या १८ षटकांत १३९ धावांत गारद झाला. सलग तिसऱ्या पराभवानंतर ओमानचा सुपर ८चा मार्ग कायमचा बंद झाला.

या पराभवामुळे गुणतालिकेतील समीकरणे मोठ्या प्रमाणात बदलली आहेत. आता आयर्लंडसमोर १७ फेब्रुवारीला झिम्बाब्वे विरुद्ध अतिशय महत्त्वाचा सामना आहे. दोन्ही संघांसाठी हा सामना अक्षरशः नॉकआउट ठरणार असून, विजेताच पुढील फेरीत प्रवेश मिळवणार आहे.

दरम्यान, ओमानचा २० फेब्रुवारीला ऑस्ट्रेलिया विरुद्ध सामना असला, तरी तो केवळ औपचारिकतेपुरता उरला आहे.

एकीकडे संघ बाद होत असताना दुसरीकडे भारतपाकिस्तान महामुकाबल्याची धडधड वाढली आहे. प्रत्येक सामना आता अंतिम फेरीसारखा निर्णायक ठरत असून चाहत्यांसाठी हा टी-२० विश्वचषक थरार, ड्रामा आणि उलटफेरांनी भरलेला ठरणार हे स्पष्ट झाले आहे.

## कुंजीरवाडी येथे बुलेटने दिलेल्या धडकेत एकाचा मृत्यू

**लोणी काळभोर, ता.१४ :** पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर पायी चाललेल्या व्यक्तीला विरुद्ध दिशेने चाललेल्या बुलेटने जोरदार धडक दिल्याची घटना घडली आहे. ही घटना कुंजीरवाडी (ता.हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील सत्कार हॉटेल व लॉज समोर शनिवारी (ता.१४) सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तर दुचाकीवर मुले ही विद्यार्थी असून अल्पवयीन असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

राजेंद्र सोपान काळभोर (वय ५२) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी अक्षय राजेंद्र काळभोर (वय ३१, रा. सिद्राममळा, रामदरा रोड, लोणीकाळभोर ता. हवेली जि. पुणे) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# राष्ट्रीय रोइंग स्पर्धेत एमआयटी एडीटीच्या भाग्यश्री घुलेची सुवर्ण कमाई

**पुणे, ता. १४ :** आर्मी रोइंग नोड येथे नुकत्याच झालेल्या ४३व्या वरिष्ठ राष्ट्रीय रोईंग अजिंक्यपद स्पर्धेत एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी क्रीडा अकादमीची खेळाडू भाग्यश्री घुले हिने उत्कृष्ट कामगिरी करत एक सुवर्ण व एक रौप्य पदक पटकावले.

या उल्लेखनीय यशासह भाग्यश्री घुलेची आगामी आशियाई स्पर्धेच्या तयारीसाठी कर्नाटकातील बेल्लारी येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सराव शिबिरासाठी निवड करण्यात आली आहे. जपान येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तयारीसाठी हे शिबिर असणार आहे. भाग्यश्री ही एमआयटी एडीटी शिक्षण संकुलातील माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुलच्या कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थीनी असून तिला विद्यापीठातील राष्ट्रीय रोइंग प्रशिक्षक संदीप भापकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. भाग्यश्रीच्या या यशामुळे विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल परंपरेत मानाची भर पडली आहे. या कामगिरीनंतर एमआयटी एडीटी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष तथा प्र.कुलपती प्रा.डॉ. मंगेश कराड, माईर्स शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. स्वाती चाटे-कराड, कुलगुरू डॉ. राजेश एस., कुलसचिव डॉ. महेश चोपडे, क्रीडा विभाग संचालक प्रा. पद्माकर फड, माईर्स एमआयटी गुरुकुलच्या प्रकल्प संचालक डॉ.ज्योती जोटवानी, एमआयटी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रिपल शर्मा यांनी या यशाबद्दल भाग्यश्रीचे अभिनंदन करत तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तिच्या कामगिरीमुळे विद्यापीठातील तसेच राज्यातील युवा खेळाडूंना निश्चितच प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.



## नाणेकरवाडी येथे मित्राचा खून करणाऱ्या आरोपीला अटक

**पुणे, ता. १४ :** चाकण औद्योगिक पट्ट्यात पुन्हा एकदा गुन्हेगारीचा रक्तरंजित प्रकार समोर आला आहे. नाणेकरवाडी येथे मित्रांमधील वाद इतका टोकाला गेला की एका तरुणानेच धारदार चाकूने सपासप वार करत आपल्या मित्राची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मृत तरुणाचे नाव किशोर सुरेश राणे (वय २५) असे आहे. बुधवारी ११ फेब्रुवारी रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास नाणेकरवाडीतील एका भाड्याच्या खोलीत हा प्रकार घडला. किशोर आणि त्याचा मित्र कपिल जितेंद्र कोसलकर हे दोघे एकत्र असताना त्यांच्यात काही कारणावरून वाद झाला. नेमका वाद कशावरून झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही; मात्र बोलाचालीतून वाद विकोपाला गेला आणि कपिलने जवळ असलेल्या चाकूने किशोरवर हल्ला चढवला.

आरोपीने किशोरच्या छातीवर आणि जबड्यावर वार केल्याने तो गंभीर जखमी झाला. आरडाओरड ऐकून स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत केली. जखमी अवस्थेत त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु अतिरक्तस्राव आणि खोल जखमांमुळे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

या प्रकरणी योगेश दत्तात्रेय नाणेकर यांनी तक्रार दिली असून चाकण दक्षिण पोलीस ठाणे यांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. घटना घडल्यानंतर पसार होण्याच्या तयारीत असलेल्या आरोपी कपिल कोसलकर याला पोलिसांनी तातडीने अटक केली. सध्या त्याच्याकडून अधिक चौकशी सुरू आहे.

## इंदापुरात किडनॅपिंग, एक्स्टॉर्शनचा थरार; पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १४ : ट्रॅक्टरच्या व्यवहारातून आणि सोन्याच्या दागिन्यांच्या पैशांच्या वादातून एका २९ वर्षीय तरुणाचे अपहरण करून तब्बल वीस तास वेगवेगळ्या ठिकाणी फिरवत बेदम मारहाण केल्याची आणि ५० हजार रुपयांची खंडणी उकळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पाच जणांविरोधात इंदापुर पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सोहेल शौकत शेख (वय २९, रा. भरणेवाडी, अंथुर्णे, ता. इंदापूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, रविवारी ८ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे २.३० वाजल्यापासून ते ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत आरोपींनी त्यांना जबरदस्तीने चारचाकी वाहनात बसवून विविध ठिकाणी नेले. गलांडवाडी क्रमांक १ येथील हॉटेल, इंदापूरमधील व्ही. पी. कॉलेज परिसर, बिजवडी येथील जंगल भाग तसेच गागरगाव हद्दीतील सोलापूर-पुणे महामार्गालगतच्या परिसरात दगड व हाताने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद




आहे.जिवंत सोडणार नाही, हातपाय तोडू, अशी धमकी देत आरोपींनी पैशांची मागणी केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. तसेच त्यांचा मोबाईल हिसकावून घेत ५० हजार रुपये रोख स्वरूपात खंडणी उकळल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.


या प्रकरणी साधु पवार, उमेश पवार, मारुती वाघमोडे, विशाल पवार आणि भैय्या पासगे यांच्याविरोधात अपहरण, मारहाण, जीवे मारण्याची धमकी व खंडणी उकळल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याची नोंद पोलीस हवालदार साळवे यांनी केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लेंडवे करत आहेत.

दिवसाढवळ्या तरुणाचे अपहरण करून मारहाण व खंडणी उकळल्याच्या घटनेमुळे इंदापूर तालुक्यात खळबळ उडाली असून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## महाराष्ट्रावर ‘हॉट अँड ह्युमिड’चं संकट

**पुणे, ता. १४ :** महाराष्ट्रात फेब्रुवारीच्या मध्यावरच उन्हाचा चटका वाढू लागला आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून १४ फेब्रुवारी रोजी राज्यात बहुतांश ठिकाणी कोरडे आणि उष्ण हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. राज्यात कुठेही पावसाची शक्यता नसून काही भागांत हॉट अँड ह्युमिड म्हणजेच उष्ण आणि दमट वातावरण जाणवणार आहे.

कोकण किनारपट्टीवर मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत उकाडा वाढण्याची शक्यता आहे. मुंबईत कमाल तापमान २९ ते ३० अंश सेल्सिअस तर किमान २४ ते २५ अंश राहील. सकाळी हलके धुके जाणवेल, तर दुपारनंतर दमटपणा वाढेल. समुद्रकिनारी मध्यम ते तीव्र वारे वाहू शकतात, मात्र त्यामुळे उकाडा कमी होण्याची शक्यता कमी आहे.



पुणे, सातारा, सांगली आणि कोल्हापूर परिसरात सकाळी थोडा गारवा असला तरी दुपारनंतर तापमान ३१ ते ३२ अंशांपर्यंत जाईल. आकाश स्वच्छ राहणार असल्याने सूर्यप्रकाश तीव्र असेल. रब्बी पिकांसाठी हे हवामान अनुकूल असले तरी शेतकऱ्यांनी पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.


उत्तर महाराष्ट्रात नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार जिल्ह्यांत दिवस उष्ण तर रात्री तुलनेने गार राहतील. तापमान ३२ ते ३४ अंशांपर्यंत पोहोचू शकते. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर आणि नांदेड येथे कोरडे व उष्ण वातावरण राहील.

विदर्भात सर्वाधिक उष्णता जाणवेल. नागपूर, अमरावती, चंद्रपूर आणि गडचिरोली येथे कमाल तापमान ३३ ते ३४ अंशांपर्यंत जाऊ शकते. पुढील काही दिवसांत तापमानात २ ते ३ अंशांची वाढ होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी दुपारच्या उन्हात अनावश्यक बाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे आणि लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिरूरमध्ये झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील ३ जणांचा जागीच मृत्यू

**पुणे, ता. १४ :** पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुका मध्यरात्री झालेल्या भीषण अपघाताने हादरला आहे. निमोणे गावाजवळ शिरूरन्हावरे चौफुला रोडवरील नलगे वस्ती परिसरात एका कारचा गंभीर अपघात होऊन एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये एका चिमुकलीचाही समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास कार भरधाव वेगात असताना अपघात घडला. धडक इतकी जोरदार होती की वाहनाचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. मात्र जखमा अत्यंत गंभीर असल्याने तिघांचा जागीच मृत्यू झाला. एका व्यक्तीला गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.



या अपघातात पवन काळे, आराध्या काळे आणि बाळासाहेब नागवडे यांचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. वाहन ताब्यात घेऊन अपघात नेमका कशामुळे झाला याचा तपास सुरू आहे. वेग, वाहनावरील नियंत्रण सुटणे किंवा रस्त्यावरील परिस्थिती यापैकी कोणता घटक कारणीभूत ठरला, याचा शोध घेतला जात आहे.

या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. एका कुटुंबावर ओढवलेल्या या दुर्दैवी प्रसंगाने स्थानिक नागरिक स्तब्ध झाले आहेत. वारंवार घडणाऱ्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर वेगमर्यादा पाळणे आणि रात्रीच्या प्रवासात अधिक सावधगिरी बाळगणे किती आवश्यक आहे, याची पुन्हा जाणीव करून देणारी ही घटना ठरली आहे.

## राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील मुलांसाठी मोठी घोषणा

**पुणे, ता. १४ :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर देण्यास राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या योजनेसाठी १६५ कोटी रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला असून शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भात अधिकृत शासन निर्णय जारी केला आहे. शिक्षणाचा हक्क कायदा २००९ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना दर्जेदार व आनंददायी शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याचा शासनाचा उद्देश आहे. त्याचाच एक भाग म्हणून शालेय साहित्यामध्ये दप्तराचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये सध्या ४१ लाख ४३ हजार ५४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. मात्र ज्या महानगरपालिका



स्वतःच्या निधीतून विद्यार्थ्यांना मोफत दप्तर देतात, त्या शाळांतील विद्यार्थ्यांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. त्यामुळे दुबार खर्च टाळून उर्वरित शाळांमधील विद्यार्थ्यांपर्यंत लाभ पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

दप्तर खरेदीसाठी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या माध्यमातून ई-निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या १ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदी तसेच विहित खरेदी नियमांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे. निधी मागणी क्र. ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध करून दिला जाईल. या निधीचा वापर नियमानुसार करणे, उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे आणि वित्त विभागाच्या सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. शासनाचा हा निर्णय अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून तो डिजिटल स्वाक्षरीने प्रमाणित आहे. या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवरील शैक्षणिक खर्चाचा ताण कमी होईल आणि विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणात मोठा धमाका! आरोपींविरुद्ध आरोप निश्चित

**पुणे, ता. १४ :** राज्यभर खळबळ उडवणाऱ्या वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणात महत्त्वाची न्यायालयीन घडामोड झाली आहे. सत्र न्यायालयाने सहा आरोपींविरुद्ध आरोप निश्चित केले असून २३ फेब्रुवारीपासून खटल्याची सुनावणी सुरू होणार आहे. त्यामुळे अनेक महिन्यांपासून चर्चेत असलेल्या या प्रकरणाला आता न्यायालयीन प्रक्रियेत निर्णायक टप्पा गाठण्याची चिन्हे दिसत आहेत.

या प्रकरणात पिंपरी चिंचवड पोलीस यांनी १४ जुलै रोजी एकूण ११ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. वैष्णवीच्या मृत्यूनंतर ५८ दिवसांनी हे आरोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले. तपासादरम्यान वैष्णवीचे पती शशांक हगवणे, सासू लता हगवणे, नणंद करिश्मा हगवणे, सासरे राजेंद्र हगवणे, दीर सुशील हगवणे आणि कुटुंबीय मित्र निलेश चव्हाण यांना अटक करण्यात आली होती. आता सत्र न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध औपचारिक आरोप निश्चित केले आहेत.



वैष्णवी हगवणे हिचा मृतदेह १६ मे रोजी भुकूम येथील सासरी पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळला होता. सुरुवातीला आत्महत्येचा संशय व्यक्त झाला; मात्र शवविच्छेदन अहवालात शरीरावर जखमांच्या खुणा आढळल्याने प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. आत्महत्या की घातपात, याबाबत संशय निर्माण झाला आणि राज्यभर संतापाची लाट उसळली. हगवणे कुटुंबाची राजकीय पार्श्वभूमी असल्याने तपास प्रक्रियेवरही प्रश्न उपस्थित झाले होते.

दरम्यान, निलेश चव्हाण याच्यावर वैष्णवीच्या अल्पवयीन मुलाला बेकायदेशीर ताब्यात ठेवून धमकावल्याचा अतिरिक्त आरोप ठेवण्यात आला आहे. सर्व आरोपींवर हुंडाबळी, आत्महत्येस प्रवृत्त करणे, छळ व मारहाण, गुन्हेगारी कट आणि पुरावे नष्ट करण्याचे आरोप आहेत.

आता न्यायालयाने आरोप निश्चित केल्याने साक्षीदारांची साक्ष आणि पुराव्यांची मांडणी याला सुरुवात होणार आहे. या सुनावणीकडे राज्याचे लक्ष लागले असून निकाल काय लागतो, यावर पुढील कायदेशीर आणि सामाजिक चर्चेची दिशा ठरणार आहे.